## ‘भारतातील पक्षी’

**‘भारतातील पक्षी’ साठी बी.एन्.एच्.एस्. मध्ये प्रकाशक सोहळा**

डॉ. सालिम अलींनी प्रकाशित केलेली माहिती आता पक्षी मित्रांना मराठीत मिळणार

मुंबईः १६ नोव्हेंबरः इंग्रजी व्यतिरिक्त लोकप्रिय भाषेत लोकांपर्यंत निसर्गाविषयी माहिती पोहोचावी हा कायम बी.एन्.एच्.एस्.चा एक प्रयत्न असतो. या दिशेत बी.एन्.एच्.एस्.चे एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे ‘भारतातील पक्षी’ हे ‘द बुक ऑफ इंडियन बर्डस्’चे मराठी भाषांतर. इंग्रजी आवृत्तीच्या १००,००० हून अधिक प्रति विकून अनेकदा परत प्रकाशित झाल्यात. ‘द बुक ऑफ इंडियन बर्डस्’ हे बी.एन्.एच्.एस्.चे पुस्तक पक्षी प्रेमीमध्ये आजही प्रचलित आहे. या पुस्तकासाठीचा प्रतिसाद बघून २००९ मध्ये याचे हिंदी भाषांतर प्रकाशित केले होते. ‘भारतातील पक्षी’ हे मराठी भाषांतर आज बी.एन्.एच्.एस्. हॉर्नबील हाऊस मध्ये श्री. विकास खारगे – भा.प्र.से. सचिव, महसूल व वनविभाग (वने), महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते प्रकाशित झाले.

१९४१ मध्ये डॉ. सालिम अलींचे पहिले पुस्तक प्रकाशित होऊन सध्या त्याची तेरावी आवृत्ती प्रकाशित होत आहे. प्रतिसाद आणि पुस्तकासाठी आवड बघता ‘द बुक ऑफ इंडियन बर्डस्’ हे पुस्तक अनेकदा छापले गेले. भारतातील पक्षी हे पुस्तक आता तीच सर्व माहिती मराठीत लोकांपर्यंत पोहोचवणार आहे.

**भारतातील पक्षीः**

‘भारतातील पक्षी‘ हे पुस्तक ‘द बुक ऑफ इंडियन बर्डस्’ या सालिम अलींच्या प्रचलित पुस्तकाचे मराठी भाषांतर असून मूळ इंग्रजी मजकुरात बदल न करता डॉ. अरूण जोशी यांनी अनुवादित केलेले आहे. या पुस्तकात पक्ष्यांच्या ५३८ प्रजाति तसेच ६४ बहुरंगी चित्रपृष्ठे आहेत. मूळ पुस्तकातील प्रादेशिक जुनी नावे तसेच पक्ष्यांची देखील जुनी नावे तशीच ठेवली गेली आहेत. पक्ष्यांची मराठी नावे त्यांचा स्वभाव किंवा जागा बघून, तर काही पक्षी त्यांच्या मूळ प्रदेशात जसे प्रचलित आहे, ती नावे वापरली गेली आहेत.

**लेखकाविषयीः**

डॉ. अरूण जोशी हे प्रचलित अध्यापक, लेखक तसेच अनुवादक आहेत. मुंबई विद्यापीठामधून पी.एच्.डी.ची पदवी मिळवून त्यांनी त्या विषयावर आधारित दोन पुस्तके प्रकाशित केली. त्यांनी अनेक पुस्तके लिहीली व अनुवादित केली आहेत, इतकेच नव्हे तर दोन क्रांतिगीते सुद्धा इंग्रजीमध्ये अनुवादित केली आहेत. वन्यजीव छायाचित्रीकरण आणि निसर्गाचा अभ्यास हे त्यांचे छंद असून ते बी.एन्.एच्.एस्. सोबत गेली कित्येक वर्षे जोडलेले आहेत. त्यांनी साधारण १५ वर्षे त्यांच्या कॉलेजमध्ये निसर्ग मंडळ चालवले. राज्य सरकारच्या वनविभागातर्फे ते दोन वेळा मानद वन्यजीव रक्षक म्हणून नियुक्त देखील केले गेले आहेत.

बिल्वदा काळे – बक्षी
जनसंपर्क अधिकारी – बी.एन्.एच्.एस्.
संपर्कः pro@bnhs.org